प्रेसनोट  दिनांक ३०/११/२०२१

आलोसे कमलेश सुधीर धुत्रे, वय ४०वर्षे, दुग्ध संकलन पर्यवेक्षक, जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय ठाणे, कोकण भवन इमारत, २रा मजला, सी.बी.डी. बेलापुर, नवि मुंबई (वर्ग– ३), यांना लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतलेबाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | ठाणे |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. | सी.बी.डी. पोलीस ठाणे, नवि मुंबई. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम ( संशोधन २०१८) सन १९८८ चे कलम ७ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक कमलेश सुधीर धुत्रे, वय ४०वर्षे, दुग्ध संकलन पर्यवेक्षक, जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय ठाणे, कोकण भवन इमारत, २रा मजला, सी.बी.डी. बेलापुर, नवि मुंबई (वर्ग– ३), रा. मु.पो. ताळाशेत, ताळारोड, ता. माणगांव, जिल्हा–रायगड. |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | २०००/– रूपये |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | २०००/– रूपये, त्यात १,०००/रुपये रोख व १,०००/रु. अकाउन्टवर ट्रान्सफर केले असे. |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार व त्यांचे वडील याच्या तबेल्यात २ जनावरं असुन त्यांचे शासकीय शुल्क प्रतिवर्ष ५०/रु. आहे. शुल्क भरले नाही तर २०/रु. दंड भरावा लागतो. तकारदार यांनी दिनांक ०१/११/२०२१ रोजी शासकीय दंडाची रक्कम ६०००/रुपये भरणा केली. लोकसेवक श्री. धुत्रे यांनी तकारदार यांचे लायसन्स रिनिव्ह करून सही शिक्का देण्याकरीता दोन महीने लागतील असे सांगुन तात्काळ पाहीजे असल्यास २,०००/रुपये लाचेची मागणी केली.<br><br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३०/११/२०२१ रोजी फोनवर पडताळणी केला असता. नमुद पडताळणी कारवाईच्या वेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे योला है वो करोना असे म्हणुन तडजोडी अंती १,०००/रु. लाचेची मागणी करून ते स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्यावरून अँसीबी ठाणे युनिटने जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय ठाणे, कोकण भवन इमारत, २रा मजला, सी.बी.डी. बेलापुर, नवि मुंबई येथे सापळ्याचे आयोजन केले असता आलोसे धुत्रे यांनी तक्रारदार यांचेकडुन रोख १,०००/रुपये लाचेची रक्कम स्विकारून १,०००/रुपये मित्राचे अकाउन्टवर मोबाईल द्वारे ट्रान्सफर करूने घेतले. अशा प्रकारे २,०००/रुपये लाचेच्या रक्कमेचा स्विकारला असता आज दिनांक ३०/११/२०२१ रोजी १६.३४ वा. जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय ठाणे, कोकण भवन इमारत, २रा मजला, सी.बी.डी. बेलापुर, नवि मुंबई येथे रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

मार्गदर्शन अधिकारी – मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले सो. पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४०० ६०१
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@ mahapolice.gov.in
अ‍ॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– १०६४
दुरध्वनी क्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस अ‍ॅप क्र. :– ९९३०९९७७००

(माधवी राजेकुंभार)
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे